# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ३१ ऑक्टोबर २०१४

## हजारो विद्यार्थ्यांनी घेतली राष्ट्रीय एकतेची शपथ

मुंबई- भारताच्या एकीकरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभ भाई पटेल यांचा जयंती उत्सव सोहळा हा राष्ट्रीय एकता दिवस म्हणून आज मुंबई विद्यापीठात साजरा करण्यात आला.राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने यावेळी हजारो विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकता आणि अखंडतेची शपथ घेतली.विशेष म्हणजे पुर्वोत्तर राज्यातील ३० विद्यार्थी सुध्दा या शपथविधी सोहळ्यात हजर होते.त्यानीही यावेळी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली.विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने कुलसचिव डॉ.एम.ए.खान यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकता आणि अखंडतेची शपथ दिली. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभाग,लोककला अकादमी,एनएसएस,स्पोर्ट्स,आजीवन अध्ययन केंद्र यांच्या सयुंक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मा.कुलगुरु डॉ.राजन वेळूकर म्हणाले की,आजचा दिवस हा ऐतिहासिक असुन प्रतिकात्मक आहे, जम्मू काश्मीर मधील पुरग्रस्तांना मदत म्हणून विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी १० रुपये गोळा करुन मदतीचा हात पुढे केला,ख-या अर्थाने राष्ट्रीय एकतेसाठी आणि अखंडतेसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेला हा पुढाकार नक्कीच कौतुकास्पद आहे.विद्यापीठ प्रशासनाने सुध्दा हातभार लावत २५ लाख रुपयांची मदत केली आहे. देशाला एकसंघ करण्यासाठी सरदार पटेल यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि देशात एकता राखण्याचा संकल्प करावा यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न व्हावेत असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी खास पुर्वोत्तर राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने भारतीय राजकारण,समाजकारण आणि अर्थकारणावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.तर भारतीय संस्कृतीचा वारसा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय एकता दिवसाच्या या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.नरेश चंद्र,बीसीयुडी संचालक डॉ.राजपाल हांडे,कुलसचिव डॉ.एम.ए.खान ,वित्त व लेखा अधिकारी अशोक फळणीकर आणि विविध प्राधिकरणातील सदस्यांसह मोठ्या प्रमाणात अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)